महाराष्ट्र शासन
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य), पुणे
दुसरा मजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, पुणे -०१
दूरध्वनी क्र - ०२०-२६०५०००६ Email ID : Web site :https://mahabhumi.gov.in

क्र/गांवठाण/ड्रोनसर्व्हे/G.T/का.वि. ६५१/२०२२ पुणे दिनांक : ०५/०८/२०२२

परिपत्रक

विषय :- ग्राऊंड ट्रुथींग आणि चौकशीच्या कामाबाबत.

राज्यात, गावठाण जमाबंदी प्रकल्प "स्वामित्व" योजनेचे काम प्रगतीत आहे. सदर प्रकल्पामध्ये ड्रोनसर्व्हे नंतर ग्राऊंड ट्रुथींग आणि चौकशीकाम हे दोन अत्यंत महत्वाचे टप्पे पुर्ण करावे लागतात. प्रकल्पाचे यश हे या दोन टप्प्यामधील कामाच्या अचुकतेवर अवलंबून आहे.

जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून काही निवडक गावांमध्ये ग्राऊंड ट्रुथींग आणि चौकशीच्या कामाची तपासणी केली असता खालील त्रुटी सकृतदर्शनी निदर्शनास आलेल्या आहेत.

१.रस्ते जागेवर अस्तित्वात असतांना ते ग्राऊंड ट्रुथींग (G.T) नकाशात घेतले नाहीत.
२.फक्त बांधीव मिळकतींचे ग्राऊंड ट्रुथींग (G.T) व नकाशा तयार केला असून धारकांच्या बांधकामालगतची जागा विचारात घेतली नाही.
३. बखळ जागा पुर्णपणे सोडली असून त्यास पॉलीगॉन पुर्ण करून नंबर ग्राऊंड ट्रुथींग (G.T) नकाशात दिलेले नाहीत.
४ .न्यायालयीन कार्यवाही चालु आहे, या कारणास्तव नकाशा तयार केला नाही. चौकशी केलेली नाही.
५. मोठया प्रमाणात बांधिव मिळकत, पडीत मिळकती चौकशीमधून सुटलेल्या आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की, चौकशी अधिकारी, ग्राऊंड ट्रुथींग आणि चौकशीचे काम काळजीपुर्वक व गांभीर्याने करत नाहीत. महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम व नगर भुमापन नियमाचे तरतुदीनुसार चौकशी केली जात नाही.

या पार्श्वभुमीवर खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

Scanned with CamScanner

१.प्रत्यक्ष जागेवर भेट देवून उपसंचालक भूमि अभिलेख यांनी ग्राऊंड ट्रुथींग आणि चौकशी कामाची पुरेशा प्रमाणात दर महा तपासणी करावी व मार्गदर्शन करावे.

२. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी प्रत्यक्ष जागेवर भेट देवून त्यांचे जिल्ह्यातील किमान ३ चौकशी अधिकारी यांच्या कामाची दर महा तपासणी विहीत परीमाणाप्रमाणे करावी.

३.उपसंचालक भूमि अभिलेख व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी, त्यांनी तपासणी केलेल्या चौकशी कामाची नोंद ( गावाचे नाव व चालता क्रमांक ,न.भू.क्रमांक ) दरमहाचे दैनंदिनीमध्ये करावी.

४. उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी यांनी, चौकशी अधिकारी म्हणून काम करत असताना, नगर भूमापन नियम पुस्तिकेतील व महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीचे काळजीपुर्वक व बिनचुक पालन करावे.

५. कार्यालय अधीक्षक (भूमापन) यांनी अ.क्र.३ प्रमाणे कार्यवाही होते की नाही याची माहिती वेळोवेळी वरिष्ठांना दयावी.

वरील सुचनांची काटेकोरपणे तात्काळ अंमलबजावणी करावी.

(निरंजन सुधांशू)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भुमि अभिलेख (म.राज्य ) पुणे.

प्रत :- अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक, भूमि अभिलेख पुणे यांना माहितीस्तव.
प्रत :- उपसंचालक भूमि अभिलेख सर्व यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- जिल्हा अक्षधीक भूमि अभिलेख सर्व यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- उप अधीक्षक भूमि अभिलेख /नगर भूमापन अधिकारी/विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख गावठाण/ शहर मापन/चौकशी अधिकारी सर्व यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner